# अटल पेन्शन योजना (एपीवाय) - ग्राहक माहितीपुस्तिका

- एपीवाय वयाच्या ६० वर्षांनंतर भारत सरकारकडून प्रतिमहिना १००० रूपये, २००० रूपये, ३००० रूपये, ४००० रूपये आणि ५००० रूपये किमान मासिक पेन्शन मिळण्याची हमी देते.
- एपीवायमध्ये सामील होण्यासाठी, ग्राहक हा भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे आणि त्याचे वय १८ ते ४० वर्षे असावे.
- ग्राहक कोणतीही बँक शाखा / पोस्ट ऑफिसद्वारे (ऑनलाइन / ऑफलाइन मोडमध्ये, जे काही उपलब्ध असेल त्याद्वारे) एपीवायमध्ये सामील होऊ शकतो.
- एपीवाय खात्यात नाव नोंदवणे आणि पती / पत्नीची माहिती देणे बंधनकारक आहे.
- बचत बँक खात्यातून स्वयं-डेबिट सुविधेद्वारे मासिक किंवा त्रैमासिक किंवा सहामाही आधारावर योगदान दिले जाते.

**प्रान, व्यवहार स्टेटमेंट्स आणि एपीवाय अंतर्गत योगदान**

- व्यवहार स्टेटमेंट आणि प्रान कार्ड कधीही व कुठेही www.npscra.nsdl.co.in>> Home>>Atalpension Yojana>> APY e-PRAN/Transaction statement view येथे भेट देत पाहता येऊ शकतात आणि प्रिंट करता येऊ शकतात.
- ग्राहकhttps://enps.nsdl.com/eNPS/APYRePrintPRAN.html>>Atal Pension Yojana>>Print APY PRAN Card, या वेबसाइटवर विहित रक्कम भरल्यानंतर फिजिकल प्रान कार्ड जारी करण्यासाठी विनंती करू शकतात.
- अटल पेन्शन योजनेत नोंदणी केल्यानंतरफिजिकल व्यवहार स्टेटमेंट वर्षांतून एकदा नोंदणीकृत पत्त्यावर म्हणजेच अटल पेन्शन योजनेसाठी नोंदणी केल्यानंतर ग्राहकाने दिलेल्या पत्त्यावर पाठवण्यात येईल.
- एपीवाय खाते / योगदानाशी संबंधित सर्व माहिती संबंधित बँक एपीवाय-एसपी शाखेकडून किंवासीजीएमएसद्वारे मिळू शकते.
- सीआरए-एनएसडीएल ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरठराविक कालावधीमध्ये एसएमएस अलर्टद्वारे योगदानासंदर्भात माहिती पाठवते.

**एपीवाय अंतर्गत ग्राहक माहितीमध्ये बदल**

- पत्ता, फोन क्रमांक इ. सारख्या वैयक्तिक माहितीमध्ये बदल करण्यासाठी ग्राहकांनी'एपीवाय सबस्क्रायबर मोडिफिकेशन फॉर्म'मध्ये इच्छित बदल भरावेत आणि तो फॉर्म आवश्यक कागदपत्रांसह एपीवाय-एसपी शाखेकडे सादर करावा. हा फॉर्म https://www.npscra.nsdl.co.in/nsdl-forms.phpयेथे ऑनलाइन डाउनलोड करता येऊ शकतो.
- एपीवाय ग्राहक योगदानाच्या वारंवारतेत बदल जसे की, त्रैमासिक योगदानाचे मासिक योगदानामध्ये किंवा सहामाही योगदानाचे तिमाही योगदानामध्ये बदल एपीवाय-एसपी शाखेकडे निवेदन सादर केल्यानंतर करू शकतात.

**पेन्शन रक्कम अपग्रेड / डाउनग्रेड करा**

- एपीवाय ग्राहक आर्थिकवर्षातून एकदा पेन्शनची रक्कम अपग्रेड / डाउनग्रेड करू शकतात.
- हे वैशिष्ट्य वापरकर्त्यांस निवडलेल्या हमीपूर्णपेन्शन रकमेनुसार जमा / प्राप्त होणारी भिन्न रक्कम पाहण्याची सुविधा देते.
- अपग्रेड झाल्यास अधिक रक्कम जमा करावी लागेल आणि डाउनग्रेड झाल्यास अतिरिक्त रक्कम ग्राहकाला परत केली जाईल.
- वर्षातून एकदा हा पर्याय बदलण्याची सुविधा उपलब्ध आहे, ज्यासाठीhttps://www.npscra.nsdl.co.in/ >>Home>>Atal Pension Yojana>>Forms>>Subscriber Maintenance>> Subscriber Modification Form येथे उपलब्ध असलेला 'एपीवाय सबस्क्रायबर मोडिफिकेशन फॉर्म' एपीवाय-एसपी शाखेकडे सादर करावा. पेन्शन रक्कम अपग्रेड करणे म्हणजे ग्राहकाच्या पेन्शन रकमेमध्ये वाढ होते आणि पेन्शन रक्कम डाऊनग्रेड करणे म्हणजे ग्राहकाच्या पेन्शन रकमेमध्ये घट होते.

**एपीवायमधून निकास**

- **ऐच्छिक निकास (६० वर्षे वय पूर्ण होण्यापूर्वी निकास):** एपीवाय खाती बंद करण्यसासाठी पूर्ण भरलेला 'अकाऊंट क्लोजर फॉर्म (व्हॉल्युण्टरी एक्झिट) फॉर्म' आणि इतर संबंधित कागदपत्रे संबंधित एपीवाय-एसपी शाखेकडे सादर करावेत. हा फॉर्म www.npscra.nsdl.co.in>>Home>>Atal Pension Yojana>>Forms>>Withdrawal Form>>Voluntary exit APY withdrawal form येथे उपलब्ध आहे. तसेच हा फॉर्म एपीवाय-एसपी शाखेमध्ये देखील उपलब्ध असेल.एपीवाय खाते बंद करण्याचा फॉर्म सबमिट केल्यानंतरएपीवाय खाते बंद झाले तरी ग्राहकांनी एपीवाय खात्याशी संबंधित बचत बँक खाते बंद करू नये, कारण ग्राहकांना मुदत पूर्ण होण्यापूर्वी एपीवाय खाते बंद केल्यामुळे मिळणारी रक्कम एपीवाय खात्याशी संबंधित बचत बँक खात्यामध्ये हस्तांतरित होते आणि बचत बँक खाते बंद केल्यास ही रक्कम हस्तांतरित करण्यामध्ये समस्या निर्माण होऊ शकते.
- **मृत्यूमुळे निकास:**दावेदार पूर्ण भरलेला 'एपीवाय क्लोजर फॉर्म (डेथ)' सोबत मृत्यू प्रमाणपत्राची प्रत संबंधित एपीवाय-एसपी शाखेकडे सादर करू शकतो. हा फॉर्म www.npscra.nsdl.co.in>>Home>>Atal Pension Yojana>>Forms>>Withdrawal Form>>APY death form येथे उपलब्ध आहे. हा फॉर्म एपीवाय-एसपी शाखेमध्ये देखील उपलब्ध असेल.
- <u>६० वर्षे वय पूर्ण होण्यापूर्वी एपीवाय ग्राहकाचा मृत्यू झाल्यास,</u>पती / पत्नीकडे ग्राहकाचे एपीवाय खाते सुरू ठेवण्याचा पर्याय आहे. हे खाते मूळ ग्राहक वयाच्या ६० वर्षे वयापर्यंत सुरू ठेवणा-या उर्वरित निहित मुदतीपर्यंत पती / पत्नीच्या नावे राखता येऊ शकते. तर पती / पत्नीला खाते सुरू ठेवायचे नसेल तर त्याला / तिला जमा पेन्शन रक्कम, म्हणजेच ग्राहकाने एपीवायमध्ये दिलेले योगदान आणि त्याच्या योगदानांवरील निव्वळ प्रत्यक्ष व्याजाची परतफेड करण्यात येईल (खाते देखरेख शुल्क वजा केल्यानंतर).
- <u>६० वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर एपीवाय ग्राहकाचा मृत्यू झाल्यास</u> ग्राहकाच्या जोडीदारास मासिक हमी दिलेली पेन्शन देय असेल आणि ग्राहकाचा जोडीदार नसेल किंवा जोडीदाराच्या मृत्यूनंतर पेन्शन रक्कम / पेन्शन योजनेनुसार जमा झालेली रक्कम ग्राहकाच्या नॉमिनीला देय असेल. हा नॉमिनी ग्राहकाची पत्नी किंवा पतीपेक्षा वेगळी व्यक्ती असावी.

**एपीवाय मोबाइल ॲप्लीकेशन**

- एपीवाय मोबाइलॲप्लीकेशन एपीवाय वापरकर्त्यांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे, जेथे शेवटचे ५ योगदान पाहता येऊ शकतात आणि कोणतेही शुल्क न भरता कधीही व्यवहार स्टेटमेंट व ई-प्रान डाऊनलोड करू शकतात. अँड्रॉईड वापरकर्ते सर्च पर्यायामध्ये 'एपीवाय ॲण्ड एनपीएस लाइट' टाइप करत गुगल प्ले स्टोअरमधून एपीवाय मोबाइल ॲप्लीकेशन डाऊनलोड करू शकतात.

**एपीवाय अंतर्गत तक्रार दाखल करणे**

- ग्राहक www.npscra.nsdl.co.in>>Home >> select: NPS-Lite येथे भेट देत किंवा सीजीएमएसच्या माध्यमातून कोणत्याही ठिकाणावरून कधीही मोफतपणे तक्रार दाखल करू शकतात.
- तक्रारीसाठी ग्राहकांना टोकन नंबर देण्यात येईल.ग्राहक“Check the status of Grievance / Enquiry already registered” वर जाऊन तक्रारीची सद्यस्थिती तपासू शकतो.

**एपीवाय सोशल मीडिया पेज लिंक्स**

| एपीवाय, पीएफआरडीए पेज येथे उपलब्ध आहे | पीएफआरडीए पेज येथे उपलब्ध आहे |
|---|---|
| **फेसबुक-** https://www.facebook.com/OfficialAPY/<br><br>**एपीवायकीपाठशालाचीयूट्यूबलिंक** -https://www.youtube.com/channel/UC5SuHg-O6ipH1J_HTfU17ug | **लिंक्डइन:**https://www.linkedin.com/in/pfrda-pension-fund-regulator-of-india-051614168/?originalSubdomain=in<br><br>**यूट्यूब**: https://www.youtube.com/channel/UCLMx1eZWY-LDeyIWCwYu15Q<br><br>**ट्विटर:** https://twitter.com/pfrdaofficial?lang=en |

**अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा:**

अटल पेन्शन योजना हेल्प डेस्क (टोल फ्री) 1800 110 069

**कृपया भेट द्या:**

**पीएफआरडीए वेबसाइट :**https://www.pfrda.org.in/>>NPS>>Atal Pension Yojana>>APY Scheme details, https://www.pfrda.org.in/>>NPS>>Atal Pension Yojana>>FAQs

**एनएसडीएल वेबसाइट:**www.npscra.nsdl.co.in>>Home>>Atal Pension Yojana>>Introduction>>APY Scheme details, www.npscra.nsdl.co.in>>Home>>Atal Pension Yojana>>FAQ's>>APY FAQ's

**एनपीएस ट्रस्ट वेबसाइट:**http://www.npstrust.org.in>>Atal Pension Yojana >>APYSchemedetails.pdf, http://www.npstrust.org.in>>Atal Pension Yojana >>APYFAQs10092015.pdf